महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
२ रा मजला, प्रकाशगड, वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी २६४७४२११ फॅक्स २६४७६९४९

क्र.महानिर्मिती/मासं-२/रवका/ दिनांक :-

# प्रशासकीय परिपत्रक ४९ दिनांक ०२-११-२००७

सुधार चिठ्ठी क्र.१० दि.१८-१०-२००७ (सर्वसाधारण आदेश क्रमांक ११२ दिनांक १२/०२/१९६२), सुधार चिठ्ठी क्र. ४ दिनांक १८-१०-२००७ (सामान्य आदेश क्रमांक १४ दिनांक ११-०४-१९६३), सुधार चिठ्ठी क्र. २ दिनांक १८-१०-२००७ (सामान्य आदेश क्रमांक १८ दिनांक २८-०५-१९६३) अन्वये अर्धकुशल कारागीर व कारागीर 'ड' (निर्मिती विभाग) यांना कारागीर 'क', वेतनश्रेणी ३ मध्ये विलीन करण्यात आले आहे.

वर नमुद केलेल्या दुरुस्ती चिठ्ठीप्रमाणे जे अर्धकुशल कारागीर व कारागीर 'ड' ज्यांना कारागीर 'क' म्हणजे वेतनश्रेणी ३ मध्ये विलीन होण्याची इच्छा नसेल त्यांनी १५-११-२००७ पर्यंत सोबत जोडलेले विकल्प भरुन द्यावे. अन्यथा त्यांना वेतनश्रेणी ३ मध्ये समाविष्ट करण्यात येईल व त्यांना वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे सेवानिवृत्त करण्यात येईल.

एकदा विकल्प दिल्यावर तो कोणत्याही स्थितीत बदलता येणार नाही.

ज्या कार्यरत अर्धकुशल कारागीर/कारागीर 'ड' यांचे वय दिनांक १५-११-२००७ रोजी ५८ वर्षे पुर्ण झाले आहे व ज्यांनी दिनांक १५-११-२००७ पर्यंत विकल्प दिलेले नाहीत, अशा कर्मचा-यांना, कारागीर 'क' मध्ये सांमावुन घेऊन दिनांक ३०-११-२००७ रोजी सेवानिवृत्त करण्यात येईल.

*मुख्य महाव्यवस्थापक(मासं)*

*प्रति*

प्रेषण यादीप्रमाणे.

# <u>विकल्प</u>

मी, श्री.-----------------------------------------------------------------------
अर्धकुशल कारागीर/कारागीर 'ड' ------------------------------------------येथे कार्यरत असुन आज दिनांक -------------------------------------- रोजी असे लिहुन देत आहे की मला कारागीर 'क' म्हणजेच वेतनश्रेणी तीनमध्ये सामील/ समाविष्ट करण्यांत येऊ नये व मी सध्याच्या पदावरच काम करण्यास तयार असुन प्रचलित नियमाप्रमाणे सेवानिवृत्तीचे ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत पुढच्या पदोन्नतीची मागणी करणार नाही.

कर्मचा-याचे नांव, पद व सही

दिनांक :-

ठिकाण:-